लोकमत

# साखरेत सहकाराऐवजी खासगीचाच बोलबाला !

## ९५ सहकारी, तर ९४ खासगी कारखाने : सहकारातून विकासाला गळती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सहकारी साखर कारखान्यांचा बालेकिल्ला असलेल्या राज्यात आता खासगी कारखानदारी जोर धरू लागली आहे. यंदा सुरू असलेल्या गाळप हंगामातील १८९ कारखान्यांमध्ये ९४ कारखाने खासगी आहेत तर ९५ सहकारी आहेत. या ९५ मधील तब्बल १४ कारखाने नावालाच सहकारी असून त्यांची दिवाळखोरी टाळायची म्हणून काही खासगी व्यक्तीच ते चालवत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात फक्त १६ कारखाने सहकारी आहेत तर २८ कारखाने खासगी नावावर आहेत. अमरावती व नागपूर या दोन जिल्ह्यांत प्रत्येकी ३ प्रमाणे ६ कारखाने सुरू असून एकही सहकारी कारखाना नाही. नांदेडमध्ये ९ सहकारी तर १७ खासगी आहेत. औरंगाबादमध्ये १२ सहकारी ११ खासगी आहेत. अहमदनगरमध्ये १७ सहकारी, ९ खासगी आहेत. कोल्हापुरात २५ सहकारी व १० खासगी तर पुणे जिल्ह्यात १६ सहकारी व १३ खासगी सहकारी साखर कारखाने आहेत. सहकारात बरीच वर्षे वावरणाऱ्या अनेकांनी सहकारात मोडीत निघालेले कारखाने विकत घेतले असून आता हे कारखाने फायद्यात आले आहेत. व्यवस्थापनासह तिथली नोकरभरती, खरेदीविक्री यावर काटेकोर बंधने आहेत. चुकीचे व्यवस्थापन, अनावश्यक नोकरभरती, अद्ययावत यंत्रसामग्रीचा अभाव व मुख्य म्हणजे भ्रष्टाचार यातून सहकारी कारखाने तोट्यात जात असल्याचे साखर उद्योगातील जाणकारांचे मत आहे. खासगी कारखाने मात्र फायद्यातच सुरू असल्याचे दिसत आहे. मात्र, सहकारी कारखान्यांमधून परिसर विकासासाठी सामाजिक बांधिलकीमधून चालवल्या जाणाऱ्या शाळा, महाविद्यालये, दवाखाने, स्वस्त बाजार अशा उपक्रमांकडे खासगी कारखाने ढुंकूनही पहात नसल्याने कारखाना असलेल्या परिसराचा तोटा होत असल्याचे अनेकांनी सांगितले.

सहकारी कारखान्यांमध्ये सरकारचे भागभांडवल असते. कारखाना मोडीत निघाला की हे भागभांडवल बुडते. अनेक नियम, कायदे केले तरीही त्याचे कारखान्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून पालन केले जात नाही व अखेरीस कारखाना दिवाळखोरीत निघतो. तोट्यात निघालेल्या सहकारी कारखान्यांची जबाबदारी शेवटी सरकारवरच येते. ही जबाबदारी घ्यायची नसल्यानेच सरकारनेही आता सहकारी साखर कारखान्यांकडे पाठ फिरवली असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.



> सरकारने सन २०१८ मध्येच कोणत्याही सहकारी साखर कारखान्याला नव्याने परवानगी द्यायची नाही असे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे खासगी कारखान्यांच्या संख्येत वाढ होत आहे. सहकारातील कारखान्यांनी खासगी कारखान्यांच्या तोडीचे व्यवस्थापन केले तर अशी स्थिती उद्भवणार नाही.
>
> **- शेखर गायकवाड, आयुक्त, साखर**